# <u>यशोगाथा</u>



मी, पुनम प्रचोदय राउत गाव - केळवे (नारतळे) ता. जि. पालघर येथील रहिवासी आहे. मी एक गृहिणी आहे. मला स्वत: काहितरी व्यवसाय करून आपल्या कुटुंबासाठी मदत करावे असे वाटत होते. तसेच माझे पती श्री प्रचोदय राऊत हे पालघर येथे टॅक्सी चालवत होते. माझ्यापण मनात विचार आला की, मी पण टॅक्सी चालवली तर आपल्या कुटूंबासाठी एक मदतच होईल परंतु मला टॅक्सी खरेदी करण्यासाठी भांडवलाची गरज पडणार होती शिवाय माझ्या कुटुंबाची परीस्थिती नाजुक असल्यामुळे मी कर्ज घेण्याचे ठरवले आणि त्यासाठी मी, जेव्हा जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र पालघर येथे भेट दिली असता तेथे मला मुद्रा कर्ज  योजनेबाबत श्री. मुकेश संखे, कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली.

त्यानुसार बॅक ऑफ बडोदा शाखा पालघर येथे माझे कर्ज प्रकरण सर्व कागदपत्रांसहित सादर केले. बॅक ऑफ बडोदा शाखेमधील श्री. प्रविण सावे व त्यांचे इतर सहकारी यांचे मला सहकार्य लाभले व माझे प्रकरण मंजुर होऊन मी स्वत:ची टॅक्सी खरेदी करून पालघर शहरात व्यवसाय करत आहे.

मुद्रा कर्ज योजनेचा मला व माझ्या कुटूंबाला फार मोठा फायदा झाला आणि माझे स्वत:चे व्यवसाय करण्याचे स्वप्न साकार झाले. मी इतर सर्वांना एकच गोष्ट सांगू इश्चिते की इतरही बेरोजगार युवक/युवतींनी या योजनेचा लाभ घेऊन स्वत:चा व्यवसाय सूरु करावा.

यासोबतच मी घेतलेल्या कर्जाचा व्याज परतावा मला अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या वयक्तिक व्याज परतावा या योजनेतुन मिळणार आहे.

**(पुनम प्रचोदय राऊत)**
**मुद्रा कर्ज योजना लाभार्थी**